महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १६ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### बिबट्याची गावांतील वाढती दहशत



### उपायांचा ठोस मार्ग कोणता?

गावागावांत बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. शेतीकाम करणारे शेतकरी, पहाटे-संध्याकाळी प्रवास करणारे विद्यार्थी, महिलांपर्यंत सर्वांनाच ही भीती सतावत आहे. जंगलक्षेत्राच्या सीमारेषा ओलांडून हे वन्यप्राणी मानवी वस्त्यांमध्ये घुसतात आणि त्यामुळे जनावरांचे, कधी मानवी जीविताचे नुकसानही होते. प्रशासनाकडे तक्रारी वाढल्या असल्या तरी ठोस उपाययोजना अद्यापही अपुऱ्या वाटतात.

या परिस्थितीमागे अनेक कारणे आहेत—जंगलातील पाण्याची कमतरता, अन्नसाखळीतील असंतुलन, वाढता विकास आणि जंगल क्षेत्राचा वेगाने होणारा ऱ्हास. वन्य प्राणी नैसर्गिक अधिवास सोडून मानवी वस्त्यांकडे वळत आहेत, आणि संकट यातून सर्वसामान्यांवरच येत आहे.

सरकार आणि वनखात्याने या समस्येला केवळ "घटना" म्हणून न पाहता, दीर्घकालीन धोरणांची गरज आहे. सीसीटीव्ही कॅमेरे, रात्री गस्त, वन्य प्राण्यांना सुरक्षित पद्धतीने पकडून जंगलात हलवणे, पाणवठ्यांची निर्मिती, तसेच ग्रामस्थांना जागरूक करणारे विशेष अभियान राबवणे ही उपाययोजना तातडीने राबवायला हव्यात. गावकऱ्यांनीही वनखात्याशी समन्वय ठेवून धोकादायक भागांत सावधगिरीचे नियम पाळायला हवेत.

पण केवळ यावरच समाधान मानून चालणार नाही. विकास प्रकल्पांची योजना करताना जंगलक्षेत्र आणि वन्य प्राण्यांचा अधिवास सुरक्षित ठेवण्याचा विचार गंभीरतेने करावा लागेल. अन्यथा "बिबट्याची दहशत" ही हेडलाईन वेगवेगळ्या गावांतून कायम ऐकू येत राहील.

सर्वांच्या सुरक्षिततेसाठी आणि पर्यावरणीय संतुलनासाठी सरकार, प्रशासन आणि गावकरी—सर्वांनी एकत्रित पावले उचलली, तरच या समस्येवर नियंत्रण मिळवता येईल.

# काँग्रेसची महाविकास आघाडीशी फारकत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई : बिहार निवडणुकीत काँग्रेसला सपाटून मार खावा लागला. ज्या जागा निवडून आल्या. त्यासाठी मोठी कसरत आणि संघर्ष करावा लागला. आता या पराभवावर सकाळी सकाळी दिल्लीत बैठक घेत काँग्रेसने मंथन केले आणि महाराष्ट्रात त्याचे धक्के जाणवायला लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रातील महाविकास आघाडीला पहिला मोठा झटका दिला आहे. हा बिहार निवडमुकीचा साईड इफेक्ट तर नाही ना अशी चर्चा रंगली आहे. काय आहे अपडेट?**



## मुंबईत काँग्रेस एकटी लढणार

काँग्रेस मुंबई महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढणार असल्याचे काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी जाहीर केले. मुंबईत महाविकास आघाडी अथवा इतर कोणासोबत जाणार नसल्याची घोषणा त्यांनी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी चेन्नीथला यांनी काँग्रेसची कार्यकर्त्यांची भूमिका आहे की वेगळं लढावं, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यात स्थानिक नेत्यांची बाजू ऐकून घ्यावी लागेल, अशी भूमिका घेतली.

**दोन ठाकरे एकत्र आल्याने घेतला निर्णय ?**

वर्षा गायकवाड यांच्यावर कोणही नाराज नाही. सर्वजण सोबत आहेत. निवडणूक आयोगाने बिहारची निवडणूक जिंकून दिली हे सर्वांना माहीत आहे, महाराष्ट्रात ही असंच झालं, असा आरोप त्यांनी केला. तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे असा निर्णय घेतला का या प्रश्नावर दोन ठाकरे एकत्र आल्याने स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला नसल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वीपासूनच कार्यकर्त्यांची तशी इच्छा असल्याचे ते म्हणाले.

**227 जागांवर लढणार**

मुंबई पालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे रमेश चेन्नीथल्ला यांनी जाहीर केले. 227 जागांवर लढणार असल्याचे ते म्हणाले. सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांची स्वबळावर लढण्याची इच्छा आहे. स्थानिक पातळीवर कार्यकर्ता सांगणार तेच करावं लागणार. काँग्रेसला मजबूत बनण्याचं आमचं काम आहे. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन आम्ही निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले. तर पक्षात स्थानिक पातळीवर कुठलीही नाराजी नाही. सगळे एक दिलाने लढणार असल्याचे ते म्हणाले. काँग्रेसची ही भूमिका मुंबई महापालिकापुरतीच असेल की राज्यातील स्थानिक स्वराज्य निवडणुकीतही ते अशीच भूमिका घेतील, यावर महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून असेल. काँग्रेस बाजूला झाल्यावर मनसे-उद्धवसेना यांची युती मुंबई महापालिकेसाठी रान उठवण्याची शक्यता आहे. बिहार निवडणुकीवरून मित्रपक्षच काँग्रेसवर हल्ला चढवताना दिसत आहेत.

# मनसेसोबत युती नाहीच - सपकाळ यांची स्पष्टोक्ती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : महाविकास आघाडी सोबत मनसेची युती झाल्यास काँग्रेस मविआतून बाहेर पडणार, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात रंगली असताना जिल्हास्तरावर युतीचा प्रस्तावच नाही, त्यात गुरुवारी राज्य निवडणूक मंडळाची अखेरची बैठक संपन्न झाली. त्यामुळे मनसे सोबत युती नाहीच, असे स्पष्ट संकेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीला वेळ असूनही निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर ठरवू, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. राज्य निवडणूक मंडळाच्या दोन दिवस चाललेल्या या बैठकीत नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. स्थानिक नेतृत्वाशी चर्चा करून उमेदवारी निश्चित करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील राजकीय समीकरणं वेगळी



आहेत. स्थानिक पातळीवर समविचारी पक्षांशी चर्चा करून आघाडी करण्यात आली आहे. काही जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडी, शेकाप, शेतकरी संघटना, रासप यांच्याशी आघाडी झालेली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारमध्ये अंतर्गत वाद पराकोटीला गेले आहेत. पण सत्तेसाठी हे सर्वजण एकत्र आहेत. सत्तेसाठी काहीही व वाट्टेल ते अशी त्यांची भूमिका आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सत्तेसाठी लाचार आहेत. त्यामुळे सत्ता सोडून ते राहू शकत नसल्यानेच ते सत्तेतून बाहेर पडणार नाहीत, असे सपकाळ म्हणाले.

# सतरा वर्षानंतर होणार जनगणना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : तब्बल सतरा वर्षांनी देशात जनगणना होणार असून या जनगणनेच्या पूर्वचाचणीला चेंबूर, गोवंडीचा भाग असलेल्या एम पश्चिम विभागातून सुरूवात झाली. यंदाची जनगणना

**मुंबईतील चेंबूरमधून श्रीगणेशा**

डिजिटल पद्धतीने होणार आहे. यापूर्वी २०१० मध्ये जनगणना झाली होती. दर दहा वर्षांनी होणारी जनगणना यंदा तब्बल सतरा वर्षांनी होणार आहे. जनगणनेच्या तयारीचा एक भाग म्हणून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम पश्चिम विभागात पूर्वचाचणी सुरू झाली आहे. पूर्वचाचणीमध्ये जनगणनेच्या सर्व पैलूंचा समावेश असेल.

# रेल्वे आरक्षित जागेवर भूमाफियांची मनमानी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारती कशा पाडायचा असा मोठा प्रश्न पालिका अधिकाऱ्यांसमोर उभा आहे. अशा परिस्थितीत डोंबिवली पश्चिमेत बेसुमार बेकायदा बांधकामे - भूमाफियांकडून सुरू करण्यात आली आहेत. डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा येथील काळुबाई मंदिराच्या पाठीमागील भागात दिल्ली ते उरण समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू मार्गाचे काम सुरू आहे. या रेल्वे मार्गासाठी सपाटीकरण करण्यात आलेल्या सीमा रेषेत भूमाफियांनी रात्रंदिवस काम करून एका बेकायदा इमारत उभारणीचे काम सुरू केले आहे.



- या बेकायदा इमारतीजवळ यापूर्वीच एक इमारत उभी आहे. बेकायदा इमारत उभारणीसाठी पुरेशी जागा नसताना उपलब्ध मोकळ्या जागेत हे बेकायदा बांधकाम केले जात आहे. या समर्पित जलदगती रेल्वे मार्गाजवळून सतत मालवाहू डब्यांमधून वेगवान पध्दतीने माल वाहतूक होणार आहे. यामुळे परिसरातील वस्ती, इमारतींना कर्णकर्कश कानठळ्या बसणाऱ्या आवाजाचे हादरे बसणार आहेत. हे माहिती असताना भूमाफियांनी या जलदगती रेल्वे मार्गात रेल्वे ठेकेदाराला न जुमानता, पालिका आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त, ह प्रभागाचे अधिकारी यांना न घाबरता बेकायदा इमारतीचे काम सुरू केले आहे.

या बेकायदा इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले तर या इमारतीचे मलनिस्सारण आणि सांडपाणी थेट जलदगती रेल्वे मालवाहू मार्गात वाहून येणार आहे. या रेल्वे मार्गाच्या बाजुला उच्च दाब वीज वाहिकांची उभारणी होणार आहे. त्यांनाही या बेकायदा इमारतीचा अडथळा येणार आहे. भविष्यात जलदगती रेल्वे मालवाहू विस्तारीकरणाचे काम करताना या बेकायदा इमारतीचा अडथळा येणार आहे. हे माहिती असुनही रेल्वे मार्गालगतची जमीन हडप करून तेथे स्थानिक भूमाफियांनी गेल्या महिन्यापासून बेकायदा इमारतीचे काम सुरू केले आहे.

या बेकायदा इमारतीचे बांधकाम घाईने पूर्ण करून त्यामध्ये रहिवास निर्माण करायचा. या इमारतीमधील सदनिका कमी किमतीत विकून मोकळे व्हायचे असे नियोजन माफियांनी केले आहे. या बेकायदा इमारतीजवळ जाण्यासाठी चार फुटाचा एक बोळातील रस्ता आहे. त्यामुळे या बेकायदा इमारतीत भविष्यात आग लागली काही दुर्घटना घडली तर त्याठिकाणी रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने, आपत्कालीन पथकाची वाहने कोठुन जाणार असे प्रश्न परिसरातील नागरिक करत आहेत. या बेकायदा इमारतीविषयी उघडपणे तक्रार केली तर भूमाफियांकडून त्रास होईल या भीतीने नागरिक मूग गिळून गप्प आहेत. कोपर येथील बेकायदा इमारत प्रकरणी विनोद जोशी आझाद मैदान येथे उपोषणाला बसले आहेत. ह प्रभागात ६५ महारेरा बेकायदा इमारत प्रकरणात एकूण १८ इमारती आहेत. डोंबिवली पश्चिमेतील गुरचरण सरकारी जमिनींवरील १४ बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यासाठी हरेश म्हात्रे यांची उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. मयूर म्हात्रे यांनी पालिकेच्या राखीव भूखंडावरील आणि इतर बेकायदा इमारत प्रकरणी पालिकेत तक्रारी केल्या आहेत. याप्रकरणी कारवाया प्रस्तावित असताना आता रेल्वे मार्गात भूमाफियाने बेकायदा इमारतीचे काम सुरू केले आहे. पालिकेच्या अधिकाऱ्याने या बांधकामाची पाहणी करून कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

# आदिवासी वीरांना श्रद्धांजली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कासा** : येथील कासा ग्रामपंचायतीतर्फे क्रांतिसूर्य जननायक बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त कासा-नाशिक राज्यमार्गावरील सायवन नाका परिसरातील बिरसा मुंडा चौकात उत्साहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी संघर्षाचे प्रतीक, जल-जंगल-जमिनीच्या हक्कासाठी आयुष्यभर लढणारे जननायक बिरसा मुंडा यांना कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली वाहणे हा कर्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. वक्त्यांनी बिरसा मुंडा यांच्या संघर्षमय जीवनाची, त्यांनी समाजाच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उठावाच्या इतिहासाची आणि आदिवासींच्या धर्म, अस्मिता व

**बिरसा मुंडा जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम**

अस्तित्व रक्षणासाठी केलेल्या संघर्षाची माहिती दिली. ते आजही प्रेरणादायी योद्धा आणि स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे मत व्यक्त केले.







# आचारसंहितेमुळे गृहस्वप्नपूर्तीला खीळ

## म्हाडाच्या लॉटरी विजेत्यांच्या नशिबी प्रतिक्षाच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : म्हाडाच्या कोकण मंडळाच्या लॉटरीत २५ वर्षांपूर्वी विजेते ठरलेल्या तब्बल १५६ विजेत्यांच्या गृहस्वप्नपूर्तीला विलंब लागणार असल्याची चिन्हे आहेत. सध्या संबंधितांसाठी म्हाडाने राखीव ठेवलेल्या घरांच्या किमती ५० लाखांच्या घरात आहेत, मात्र विजेत्यांचा घराचा हक्क जुना असल्याने त्यांच्यासाठी घरांच्या किमती कमी करण्याची तयारी म्हाडाने दर्शवली आहे, परंतु सध्या राज्यात नगरपालिका निवडणूक आचारसंहिता सुरू असल्याने त्याबाबत निर्णय घेण्यावर म्हाडा प्राधिकरणावर मर्यादा आहेत. त्यामुळे तूर्तास विजेत्यांना घरासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

म्हाडाकडून सर्वसामान्यांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्याने लॉटरी काढल्या जातात. त्याचप्रमाणे कोकण मंडळाने २००० मध्ये काढलेल्या लॉटरीत चितळसर ठाणे येथील अत्यल्प आणि अल्प उत्पन्न गटातील २०० घरांचा समावेश होता. त्यानुसार अर्ज केलेल्या १५६ जणांना येथील योजनेमध्ये घरे लागली खरी, पण या भूखंडावर आरक्षण असल्याचे तांत्रिक कारण पुढे करत ठाणे महापालिकेने घरांच्या प्रकल्पाला परवानगी नाकारली होती. दरम्यान, म्हाडाच्या लॉटरीत विजेते ठरलेल्या अर्जदारांना म्हाडाने त्यांच्याकडून घेतलेली अनामत रक्कम परत केली नव्हती. त्यामुळे ते घराच्या प्रतीक्षेत होते. दरम्यान, कोकण मंडळाने नुकत्याच जाहीर केलेल्या घरांच्या लॉटरीत तत्कालीन विजेत्यांसाठी चितळसर येथील घरे राखीव ठेवली होती, मात्र त्यांच्या किमती ५० लाखांच्या घरात होत्या, तर २००० मध्ये काढलेल्या लॉटरीच्यावेळी तुलनेने घरांच्या किमती खूपच कमी होत्या. त्यामुळे आताच्या किमतींनुसार घर घेणे आमच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने आमचा सहानभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी विजेत्या अर्जदारांनी म्हाडाकडे केली आहे.म्हाडा प्राधिकरणाने सुमारे ३६ लाख रुपयांपर्यंत किमती कमी करण्याचे विजेत्यांना अश्वासन देतानाच त्याबाबतचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणाला पाठवावा असे स्पष्ट केले होते.

**१५६ विजेत्यांना घरासाठी प्रतीक्षाच**

त्यानुसार प्रस्ताव तयार करून प्राधिकरणाकडे गेला आहे. त्याचवेळी नगरपालिका निवडणुकांची आचारसंहिता लागली आहे. म्हाडा प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर असल्याने किमती कमी करण्याचा निर्णय घेणे शक्य नसल्याचे म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे बालदिन उत्साहात साजरा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे बालदिन अर्थात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात भिवंडी पंचायत समितीच्या माजी सभापती ललिता पाटील यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली.

यावेळी राहनाळ गावचे प्रभारी सरपंच प्रताप पाटील, ग्रामपंचायत सदस्य उमेश पाटील, दीपक भोईर, मनीषा भोईर तसेच युवा कार्यकर्ता संकल्प भोईर उपस्थित होते. प्रभारी सरपंच प्रताप पाटील यांनी आपल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे महान व्यक्तिमत्त्व, देशप्रेम, लोकशाहीविषयक दृष्टीकोन आणि मुलांप्रती असलेले अपार प्रेम यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मनीषा भोईर यांनी शाळेत आले की लहान झाल्यासारखे वाटते, तो आनंद इथेच मिळतो, मुलं ही हासरी फुले आहेत असे सांगत विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ललिता पाटील यांनी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे विशेष कौतुक केले. मुलांनी पंडित नेहरू यांचा एक तरी गुण अंगी बाणवून आपल्या जीवनाचे सार्थक करावे असे आवाहन केले. ग्रामपंचायत सदस्य दीपक भोईर, मनीषा भोईर आणि संकल्प भोईर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थी सिद्धे पांडे आणि रुद्र झुंजारराव यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनाविषयी मनोगत सादर केले. इयत्ता दुसरी आणि तिसरीतील विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर करून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. मुख्याध्यापक अजय पाटील यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मुलांवरील प्रेमाची प्रेरणादायी माहिती विद्यार्थ्यांशी शेअर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश ठाकरे आणि रूपाली सांबरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संगीता पाटील यांनी केले.

# युनेस्को ही एक संयुक्त राष्ट्र संघटना




युनेस्को ही एक संयुक्त राष्ट्र संघटनेची शाखा असून शैक्षणिक वैज्ञानिक आणि संस्कृतीक बाबींचे संवर्धन व जतन करण्यासाठी कार्य करते.शैक्षणिक क्षेत्रात सर्वांसाठी शिक्षण हे युनेस्कोचे ब्रीद आहे तर वैज्ञानिक क्षेत्रात संशोधनास प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत असते. तसेच संस्कृतीक क्षेत्रात जगभरातील संस्कृतिक नैसर्गिक आणि मिश्र (नैसर्गिक व सांस्कृतिक) स्थळांना जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करणे आणि त्याचे जतन व संवर्धन करण्याचे कार्य करते.

दरवर्षी 18 एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून साजरा केला जातो. युनेस्को चे मुख्यालय पॅरिस येथे आहे. UNESCO Longform- United Nations Educational, Scientific and Cultural Organization.सध्याचे UNESCO Director General– Audrey Azoulay हे आहेत.

**भारत आणि युनेस्को**

भारत 1946 पासून युनेस्को चा संस्थापक सदस्य आहे. भारत, अमेरिका, फ्रान्स, चीन, इंग्लंड, तुर्की,ब्राझील आणि मेक्सिको हे युनेस्कोचे संस्थापक देश आहेत. 1948 मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची युनेस्कोच्या कार्यकारी मंडळावर अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. भारतामध्ये युनेस्कोने 2025 पर्यंत 44 स्थळांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली आहे. यामध्ये 36 सांस्कृतिक स्थळे, सात नैसर्गिक स्थळे आणि एक अभयारण्य यांचा समावेश आहे. युनेस्कोने आतापर्यंत जगभरात जाहीर केलेल्या वारसा स्थळांच्या यादीत असलेल्या देशांमध्ये भारत सहाव्या क्रमांकावर आहे.भारतात महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त सहा जागतिक वारसा स्थळे आहेत.युनेस्कोचे आशिया खंडातील मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

युनेस्कोने 1883 मध्ये भारतातील सर्वात प्रथम अजिंठा, वेरूळ, आग्राफोर्ट आणि ताजमहल या स्थळांना जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली.सन 2023 मध्ये युनेस्कोने भारतातील रवींद्रनाथ टागोर यांचे शांतिनिकेतन आणि कर्नाटकातील होयसळ मंदिरे यांना याला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे भारतासाठी ही खूप अभिमानास्पद आणि आनंदाची बातमी आहेआहे, युनेस्कोने जुलै 2024 मध्ये भारतातील आसाम राज्यातील मोईडाम (ओहम राजघराण्यातील लोकांची दफन स्थळे) स्थळाला जागतिक वारसा म्हणून मान्यता दिली आहे आसाम मधील काझीरंगा नॅशनल पार्क आणि Manas Wildlife Sanctuary नंतर मोईडाम हे तिसरे जागतिक वारसा स्थळ आहे. युनेस्कोने जुलै 2025 मध्ये महाराष्ट्र आणि तामिळनाडू मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली आहे. यामध्ये राजगड,रायगड, लोहगड, पन्हाळगड, साल्हेर, शिवनेरी, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग,खांदेरी इत्यादी अकरा किल्ले महाराष्ट्रातील आहेत तर जिंजी किल्ला तामिळनाडूमध्ये आहे.

सप्टेंबर 2025 मध्ये भारतातील सात नैसर्गिक स्थळांचा युनेस्कोच्या अस्थाई यादीमध्ये समावेश करण्यात आला यामध्ये डेक्कन ट्रॅप मधील महाबळेश्वर आणि पाचगणी (महाराष्ट्र) , मेघालयातील गुंफा (पूर्व खासी हिल्स, मेघालय), नागा हिल्स ओफीओलाईट (किफायर, नागालँड), तिरुमाला हिल्स-तिरुपती आणि एरामट्टी डिब्बालू – विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश), सेंट मेरी आयलँड कर्नाटक- उडुपी (कर्नाटक) ह्या सात स्थळांचा युनेस्को वारसा स्थळांच्या अस्थाई यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

भारतातील कोणत्या राज्यांमध्ये युनेस्को जागतिक वारसा स्थळे नाहीत? पंजाब,जम्मू काश्मीर, लडाख, मणिपूर,मिझोराम, त्रिपुरा,अंदमान निकोबार या राज्यांमध्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकही युनेस्को जागतिक वारसा स्थळ नाही.

भारतातील अमूर्त वारसा– गरबा नृत्य भारतातील गुजरात राज्यातील गरबा नृत्याला युनेस्कोने 2023 मध्ये अमूर्त वारसा यादीमध्ये समाविष्ट केले आहे.

भारतातील पहिले युनेस्को सिटी ऑफ लिटरेचर शहर कोझिकोडे, केरळ Kozhikode location

**वर्ल्ड क्राफ्ट सिटी**– भारतातील जयपुर (राजस्थान) मलप्पुरम (केरळ),म्हैसूर( कर्नाटक) आणि अलीकडेच श्रीनगर( जम्मू आणि काश्मीर) हे युनेस्कोने वर्ल्ड क्राफ्ट सिटी म्हणून घोषित केले आहे.

भारत सरकारने राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेली पुरातत्वीय स्थळे तसेच ऐतिहासिक वास्तु यांच्या संवर्धनासाठी वारसा दत्तक योजना वास्तु मित्र ही योजना सुरू केली आहे.

**जग आणि युनेस्को**

सन २०२५ पर्यंत, युनेस्कोने इटलीमध्ये सर्वाधिक जागतिक वारसा स्थळे घोषित केली आहेत. इटलीमध्ये ६१, चीनमध्ये ६०, जर्मनीमध्ये ५५, फ्रान्समध्ये ५४ आणि स्पेनमध्ये ५० जागतिक वारसा स्थळे आहेत. जगभरातील नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा स्थळांवर हवामान बदलाचा होणारा परिणाम हा युनेस्कोच्या चिंतेचा विषय आहे, म्हणून २०२३ मध्ये, युनेस्कोने वारसा बदल हा विषय (थीम) जाहीर केला. २०१८ मध्ये, अमेरिका आणि इस्रायलने युनेस्कोमधून त्यांचे सदस्यत्व काढून घेतले.

**सारांश**

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना म्हणजेच युनेस्को (UNESCO) ची स्थापना 1946 मध्ये झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर या संस्थेची पायाभरणी झाली आणि तिच्या स्थापनेमागे एक मोठा विचार होता – शांतता केवळ राजकीय करारांवर टिकत नाही, ती ज्ञान, संस्कृतीची देवाणघेवाण आणि राष्ट्रांतील सहकार्यावर उभी राहते. गेल्या काही दशकांत युनेस्कोने आंतरराष्ट्रीय करार तयार केले, वारसा जतन केला, विज्ञानाला चालना दिली आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

भारत आणि युनेस्को यांचा संबंध अत्यंत दृढ आहे. स्वातंत्र्यानंतर भारत युनेस्कोचा सदस्य झाला आणि आज तो सर्वात सक्रिय सदस्यांपैकी एक आहे. भारतात तब्बल ४४ जागतिक वारसा स्थळे आहेत – प्राचीन मंदिरे, किल्ले, नैसर्गिक अभयारण्ये आणि मिश्र वारसा यांचा समावेश आहे. स्मारकांबरोबरच भारताने अमूर्त वारशामध्येही भर टाकली आहे, जसे की शास्त्रीय नृत्य, योग, पारंपरिक सण. २०२५ मध्ये मराठा मिलिटरी लॅण्डस्केप्स या वारशाच्या नोंदणीमुळे भारताचा लष्करी इतिहास आणि स्थापत्यकलेची परंपरा जगासमोर आणखी अधोरेखित झाली.

**जागतिक स्तरावर युनेस्को पाच क्षेत्रांमध्ये कार्य करते** – शिक्षण, नैसर्गिक विज्ञान, सामाजिक विज्ञान, संस्कृती आणि संवाद. त्याचा जागतिक वारसा कार्यक्रम हे एक महत्त्वाचे पाऊल असून यात "Outstanding Universal Value" असलेल्या स्थळांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर संरक्षण केले जाते. तसेच सर्वांसाठी शिक्षण, वैज्ञानिक सहकार्य, सांस्कृतिक विविधता आणि माहितीचा स्वातंत्र्यपूर्ण प्रसार यांना चालना दिली जाते.

**२०२५ ची थीम आहे** – "Reporting in the Brave New World – The Impact of Artificial Intelligence on Press Freedom and the Media." या विषयातून कृत्रिम बुद्धिमत्ता पत्रकारितेला बळकट करेल की धोक्यात आणेल, याविषयी चिंतन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवसंकल्पना आणि जबाबदारी यामधील समतोल साधणे गरजेचे असल्याचे युनेस्को दाखवून देते. परंपरा आणि तंत्रज्ञान यांचा संगम घडवून, शांतता व प्रगती ही सामायिक ज्ञान व समजुतीतूनच साध्य होऊ शकते हे युनेस्को जगाला स्मरण करून देते.

# ठाणे महापालिका हद्दीत रेबीज पल्स लसीकरण मोहीम





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : केंद्र शासनाच्या "Rabies Free India" धोरणांतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीत "Rabies Free Thane" मोहीम सन 2024 पासून राबविली जात आहे. रेबीज पल्स मोहिमेसह दैनंदिन लसीकरण मोहीम आजपासून (14 नोव्हे.) महापालिका हद्दीत सुरू करण्यात आली आहे.

ठाणे शहराला सन 2030 पर्यंत रेबीज नियंत्रणित क्षेत्र म्हणून घोषित करणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

ठाणे महानगरपालिकेने जानेवारी-फेब्रुवारी सन 2024 व 2025 मध्ये पल्स लसीकरण मोहिम कार्यक्रमांतर्गत जानेवारी 2024 मध्ये 7,409 भटके श्वान लसीकृत करण्यात आले. तर फेब्रुवारी 2025 मध्ये 11,582 भटके श्वान लसीकृत करण्यात आले असल्याची माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली.

या मोहिमेत भटक्या कुत्रे व मांजरांचे अँटी-रेबीज लसीकरण करुन रेडीयम रिफलेक्टर कॉलर भटक्या श्वानांच्या गळयात घालण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्राणी मित्र संस्थेचे स्वयंसेवक व स्थानिक स्वयंसेवी संस्थांची (NGOs) मदत घेण्यास व सहभागी करुन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

# केडीएमसीचे माजी महापौर रमेश जाधव यांचा ठाकरे गटातून शिवसेनेत प्रवेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवलीचे माजी महापौर तसेच उबाठा गटाचे कल्याण लोकसभा सह संपर्कप्रमुख रमेश जाधव यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत आपल्या अनेक समर्थकांसह शिवसेनेमध्ये प्रवेश केला. शुक्रवारी रात्री राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख निलेश शिंदे, मल्लेश शेट्टी, तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय घडामोडींना मोठा वेग आला आहे. विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेते भाजप आणि शिवसेनेत दाखल होत असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील गळती सतत सुरूच आहे. काही दिवसांपूर्वीच या पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिपेश म्हात्रे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. अवघ्या आठवड्याच्या आत आता या पक्षाला आणखी एक मोठा राजकीय धक्का बसला आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जाधव यांच्या प्रवेशाचे स्वागत करत आगामी राजकीय आणि सामाजिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेनेने एकजुटीने आणि विकासाच्या ध्येयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले. रमेश जाधव यांचा पक्षप्रवेश हा कल्याण डोंबिवलीतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडविणारा मानला जात आहे.

# बदलापूरमधून २४ किलो गांजा जप्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**बदलापूर** : बदलापूर पश्चिम येथील वालीवली परिसरात अमली पदार्थांच्या मोठ्या वाहतुकीवर उल्हासनगर गुन्हे अन्वेषण विभागाने शुक्रवारी मोठी कारवाई केली. पथकाने सापळा रचून दोन संशयितांना दुचाकीसह ताब्यात घेतले असून त्यांच्या जवळून तब्बल २४ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. पथक गस्त घालत असताना हवालदार राजेंद्र थोरवे यांना माहिती मिळाली की, वालिवली परिसरात दुचाकीवरून दोघे गांजा घेऊन येणार आहेत. यावर पथकाने तत्काळ सापळा रचला आणि कपिश नवले व एकनाथ नाईक या दोन्ही आरोपींना दुचाकीसह ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता २४ किलो गांजा, एक दुचाकी आणि मोबाइल असा मिळून १० लाख १९ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# के. एन. टावरे विद्यालयाच्या २००४ बॅचचे माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी** : भिवंडी येथील जुनांदुर्खी श्रमिक मंडल संचालित के. एन. टावरे विद्यालय येथे २००३-२००४ च्या दहावीच्या बॅचचे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास सुमारे ५० हून अधिक माजी विद्यार्थी-विद्यार्थीनींनी या कार्यक्रमात सहभागी होत जुन्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमास वरिष्ठ शिक्षिका निर्मला कसोटे, शीतल कागरे, मीना पाटील, भगवान उराडे, मुख्याध्यापक विनोद देवळीकर, जुनांदुर्खी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक पारधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे कर्मचारी व प्रसिद्ध सूत्रसंचालक राजेंद्र पाटील यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी जयेश जाधव, शिवाजी राऊत, प्रवीण पाटील, यतीन पाटील, भूषण, शेखर यांनी विशेष परिश्रम घेतले.

माजी विद्यार्थी प्रशांत बर्डे, रुपेश बाबर, हर्षला पाटील, अतुल खापरे, शिवाजी केणे, अस्मिता बाबरे, चेतन रापटे, हेमंत देशमुख, स्नेहा गायकवाड, दीपाली पाटील, प्रवीण पाटील, सुनीता पाटील, नितेश बाबरे आदींनी आपल्या आठवणी सांगून वातावरण भावनिक केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण प्रशांत बर्डे यांनी सादर केलेली भावस्पर्शी कविता ठरली. त्यांच्या कवितेमुळे सर्वांच्या डोळ्यांसमोर शालेय दिवसांचे सुंदर चित्र तरळले.

कार्यक्रमाच्या शेवटी केक कापून व शिक्षकांचे चरणस्पर्श करून स्नेहसंमेलनाची सांगता करण्यात आली. त्यानंतर शिक्षक देवळीकर यांनी सर्वांना गोल्डन छडी देत जुन्या वर्गातील शैक्षणिक वातावरणाची आठवण करून दिली. कार्यक्रम संपताना सर्वांच्या डोळ्यांत जुन्या आठवणींनी पाणी तरळले आणि पुन्हा भेटण्याची इच्छा सर्वांनी व्यक्त केली.




# भविष्यवेध



रविवार
१६ नोव्हेंबर २०२५

**मेष**
नातेवाईकांकडून आर्थिक मदत मिळेल. तथापि, तुम्हाला आर्थिक बाबतीत सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे. कारकिर्दीत गुरुंचे सहकार्य मिळेल.

**वृषभ**
आत्मविश्वास यश मिळवून देईल. जोडीदाराकडून प्रेमाची अपेक्षा असेल तर आशा पूर्ण होतील. जोडीदारासोबत बाहेर फिरायला जाल.

**मिथुन**
हवामानाचा आनंद घेऊ शकता. आज तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत असेल. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**
काही प्रयत्नांमध्ये भावंडांकडून पूर्ण पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. कामाच्या ठिकाणी काही लोकांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल.

**सिंह**
नोकरीच्या शोधात असलेल्यांना चांगल्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते. तुम्हाला थोडे थकवा जाणवू शकतो, परंतु संध्याकाळपर्यंत तुम्हाला बरे वाटेल.

**कन्या**
आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. यामुळे तुमच्या नात्यात गोडवा येईल. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ**
राजकारणात सहभागी असलेले लोक एखाद्या सामाजिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात, जिथे तुमचे बोलणे सर्वांचे लक्ष वेधून घेईल.

**वृश्चिक**
कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. वैवाहिक सौहार्द सुधारेल. विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांच्या शिक्षकांकडून पूर्ण सहकार्य मिळेल.

**धनु**
आरोग्य सुधारेल. वडिलांचे प्रेम आणि आशीर्वाद मिळतील. मन आनंदी असेल. बाहेरच्या प्रवासाचा काळ असेल आणि या सहली आनंददायी असतील.

**मकर**
ऊर्जा चांगल्या कामांवर केंद्रित कराल. घरात आनंददायी वातावरण असेल. तुमच्या शैक्षणिक इच्छा पूर्ण होतील. परीक्षेत चांगले निकाल मिळतील.

**कुंभ**
समृद्धी आणि आर्थिक परिस्थितीला फायदा होऊ शकतो. काही अडथळ्यांमुळे कामातील तुमची प्रगती काही दिवसांसाठी खुंटू शकते.

**मिन**
तुमच्या आहाराकडे लक्ष द्या, ज्यामुळे तुम्ही तंदुरुस्त आणि निरोगी राहाल. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना आज खूप फायदा होईल.

## ठाणे महापालिका क्षेत्रातील
# पाळीव प्राण्यासाठीच्या पहिल्या शवदाहिनीचे लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात पाळीव प्राण्यांसाठी गॅसवर आधारित पहिली शवदाहिनी सुरू झाल्यामुळे प्राणीप्रेमींची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होत आहे. डॉग शेल्टर आणि पेट गार्डन हा आपला पुढील संकल्प असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. बाळकुम अग्निशमन केंद्रामागे माजिवडा गाव येथे उभारण्यात आलेल्या पाळीव प्राण्यांसाठीच्या पहिल्या गॅसदाहिनीचे लोकार्पण शनिवारी सकाळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

ठाणे शहरात पाळीव प्राण्यांसाठीही स्मशानभूमी असावी अशी विनंती मी तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली होती. त्यानुसार, माजिवडा गाव स्मशानभूमीलगत पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्यात आली आहे. या स्मशानभूमीचे प्रवेशद्वार वेगळे आहे. या स्मशानभूमीमुळे प्राणीप्रेमींची वर्षानुवर्षांची मागणी पूर्ण झाली आहे, असे यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. याप्रसंगी, माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, कार्यकारी अभियंता संजय कदम, वैद्यकीय अधिकारी डॉ. योगिता धायगुडे, पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षमा शिरोडकर, उप बी. व्ही. अभियंता गव्हाणे, प्राणी मित्र संघटनेच्या सोनाली सजननी आदी उपस्थित होते.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते गॅसदाहिनीचे लोकार्पण

भटक्या कुत्र्यांची समस्या लक्षात घेऊन मानवी वस्तीपासून दूर, घोडबंदर रोड परिसरात एक डॉग शेल्टर उभारण्याची सूचना मी महापालिका आयुक्त सौरभ राव यांना केली आहे. त्यासाठी आता जागेचा शोध सुरू आहे. तसेच, मुंबईच्या धर्तीवर ठाण्यात पेट गार्डन विकसित करण्याचाही मानस असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील ओवळा-माजिवडा विधानसभा क्षेत्रातील स्मशानभूमींचे नुतनीकरण आणि सुशोभीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी राज्य सरकारने महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयीसुविधांचा विकास या अंतर्गत ५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यात येऊर गाव, रामबाग-उपवन, माजिवडा गाव, वाघबीळ गाव आणि मोघरपाडा येथील स्मशानभूमीच्या नुतनीकरण आणि सुशोभीकरणाचे काम करण्यात येत आहे. त्यापैकी माजिवडा गाव येथील स्मशानभूमीच्या नुतनीकरणातंर्गत पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी उभारण्यात आली आहे.

# भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिका अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत व यांत्रिकी) प्रशांत भागवत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी उपस्थित कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, इतर कर्मचारी वर्ग तसेच समाज बांधव व नागरिक यांनी देखील भगवान बिरसा मुंडा यांचे प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध महाविद्यालय, शाळा यामधे देखील भगवान बिरसा मुंडा यांच्या जन्मशताब्दी निमित्त १ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये "जनजाती गौरव पंधरवडा" निमित्त अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामधे प्रगती कनिष्ठ महाविद्यालय, डोंबिवली पूर्व येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त आदिवासी जीवनावर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच आदिवासी लोकनेते याविषयावर आधारित माहिती पटाचे सादरीकरण, प्रदर्शन, वेशभूषा स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात आले होते. तर कल्याण पश्चिम मधील कॅ.रविंद्र माधव ओक हायस्कुल येथे भगवान बिरसा मुंडा जन्म शताब्दी निमित्त दि.१ ते १५ नोव्हेंबर २०२५ या पंधरवड्यात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इ.चे आयोजन करण्यात आले होते. महापालिका क्षेत्रातील इतर शाळांनी देखील या पंधरवड्यात आदिवासी लोकनृत्य, चित्रकला स्पर्धा, इतिहास कलाकृती आणि संस्कृती प्रदर्शन ,तारपा नृत्य, आदिवासी खाद्य पदार्थ प्रदर्शन, वारली पेंटिंग, रांगोळी प्रदर्शन अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले.

# छायाचित्रकारांनी कामावर श्रद्धा ठेवावी



## ज्येष्ठ छायाचित्रकार पराग शिंदे यांचा सल्ला

## ही स्पर्धा गेल्या २६ वर्षांपासून सातत्याने सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** फोटो अल्बम तयार करण्यात घाई-गडबडीमुळे छायाचित्रकारांचा मूलभूत दृष्टिकोन दुर्लक्षित होतो. छायाचित्रकारांनी आपल्या कामावर श्रद्धा ठेवणे गरजेचे आहे, असा सल्ला ज्येष्ठ छायाचित्रकार पराग शिंदे यांनी दिला. छायाचित्रकारांच्या कार्यामुळे समाजात क्रांती घडली आहे, असे प्रतिपादन उद्योजक परीक्षित प्रभुदेसाई यांनी केले. फोटो सर्कल सोसायटीच्या वतीने छायाचित्र प्रदर्शन 'आविष्कार २०२५'चे बुधवारी उद्घाटन झाले. यावेळी प्रिया प्रभुदेसाई आणि फोटो सर्कल सोसायटीच्या अध्यक्षा अंजू मानसिंग उपस्थित होत्या.

प्रभुदेसाई म्हणाल्या, "ही स्पर्धा गेल्या २६ वर्षांपासून सुरू आहे. इतकी वर्षे एक स्पर्धा सतत चालविणे सोपे नसते. मानसिंग यांनी डिजिटल फोटोग्राफीच्या युगात प्रिंटिंग मागास होत चालल्याचे सांगितले. मात्र, प्रिंट केलेल्या फोटोंचा आनंद वेगळाच असतो, असे नमूद केले.

# कल्याण पूर्वेत 'भिम महोत्सवाला सुरवात

## विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती कल्याण पूर्वचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती कल्याण पूर्व यांच्या विद्यमाने कल्याण पूर्वेत शुक्रवारपासुन 'भिम जयंती महोत्सवाला सुरवात झाली आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या सह नागरिकांनी बुद्धवंदना करून भिम महोत्सवाला सुरवात करण्यात आली.

कल्याण पूर्वेतील ड प्रभाग कार्यालया जवळील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राच्या प्रांगणात हा भिम महोत्सव दि. १४ ते १७ नोव्हेंबर या सलग ३ दिवस आयोजित करण्यात आले असून भिम महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत गायकांच्या माध्यमातून समाज प्रबोधन होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन या वर्षीचे जयंती उत्सव समिती अध्यक्ष सुमेध हुमणे, सचिव आतिष गायकवाड, कोषाध्यक्ष राजू रोकडे यांच्या समितीने जेष्ठ नेते अण्णासाहेब



रोकडे आणि देवचंद अंबादे यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. या भिम महोत्सवा अंतर्गत शुक्रवार 'द बिट्स ऑफ संघा' हा बुध्द भिम गितांवर आधारीत संगित कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमाअंतर्गत स्मारक निर्मितीसाठी योगदान देणाऱ्यांसह कल्याण डोंबिवली परिसरातील अनेक प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन ब्रेंदे, गायीका कडूबाई खरात यांचा बुद्ध भिम गितांचा प्रबोधनात्मक संगीतमय कार्यक्रम शनिवारी पार पडला. तर रविवारी सुप्रसिध्द इतिहास अभ्यासक श्रीमंत शिवाजी कोकाटे यांचे 'भारताचे आधरस्तंभ 'छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ . बाबासाहेब आंबेडकर' यांच्या जिवनावर आधारीत व्याख्यान होईल होईल. या व्याख्यानानंतर क्रांतीकारी शितल साठे, शाहीर सचिन माळी यांच्या प्रबोधनात्पर महाजलस्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी सायं. ७ नंतर सुप्रसिद्ध निवेदिका पूजा मळेगावकर प्रस्तुत 'सौभाग्यवती २०२५' खेळ रंगला पैठणीचा हा महिलांसाठीच्या 'होम मिनिस्टर' चा खास कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास तमाम अंबेडकर प्रेमी जनतेने उपस्थित रहाण्याचे आवाहन डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, डॉ . बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, तसेच डॉ . बाबासाहेब आंबेडकर अभिवादन समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विकासकाला धमकावल्या प्रकरणी युवासेना पदाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणजवळील वडवली परिसरात बांधकाम व्यावसायिकाला धमकावून खंडणी मागितल्याप्रकरणी शिवसेनेच्या (शिंदे गट) युवा सेना उपशहर प्रमुख वैभव पाटील याच्यासह एकूण सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बांधकाम सुरू असलेल्या 'मंगेशी कन्स्ट्रक्शन'च्या साइटवर येऊन आरोपींनी काम बंद पाडले, शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी देत खंडणीची मागणी केल्याचा आरोप विकासकाने केला आहे. तर निवडणुका लक्षात घेऊन विरोधकांनी रचलेला हा डाव असून, व्यावसायिकाला हाताशी धरून चुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा प्रति-आरोप वैभव पाटील यांनी केला आहे. सध्या याप्रकरणी खडकपाडा पोलिसानी गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे.

> **निवडणुका लक्षात घेऊन विरोधकांनी रचलेला हा डाव**
> **- युवासेना उपशहर प्रमुख वैभव पाटील**

कल्याण पश्चिममधील बांधकाम व्यावसायिक मंगेश गायकर, यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नुसार गायकर यांची वडवली परिसरात 'मंगेश स्टार', 'मंगेशी हेवन' आणि 'मंगेशी जेमिनी' या नावाचे बांधकाम प्रकल्प (प्रोजेक्ट) सुरू आहेत. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३३ वाजता वैभव पाटील आणि सुनिल पाटील यांच्यासह एकूण ७ आरोपी पंकज पाटील, उद्धव पाटील, तेजस पाटील, ध्रुव पाटील, करण पाटील, बेकायदेशीररित्या साइटवर येऊन कामगार आणि कंत्राटदारांना व ऑफिस स्टाफला शिवीगाळ करत काम पूर्णपणे बंद पाडत "हा एरिया आमचा आहे. माल आमच्याकडून घ्यावा लागेल. माल नाही घेतल्यास प्रत्येक गाडीमागे ३,००० रुपये द्यावे लागतील, अशी अवैध पैशांची मागणी करत. आम्ही सांगत नाही तोपर्यंत साईट चालू करायची नाही, नाहीतर जीवे ठार मारीन, अशी थेट धमकी दिल्याचा गुन्हा खडकपाडा पोलीस स्टेशन मध्ये दाखल केला आहे.

तर मंगेश गायकर यांच्या आरोप आणि तक्रारीनंतर युवा सेना उपशहर प्रमुख वैभव पाटील यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळत मी स्थानिक व्यवसायिक असून गावातील स्थानिक तरुणांना काम मिळावे यासाठी बांधकाम व्यावसायिकांशी दोन वेळा बैठका झाल्या होत्या, पण काम दिले नाही. आता गुन्हा दाखल झाल्याची माहिती पोलीसानी दिली २० दिवसांनंतर गुन्हा दाखल करणे, हे संशयास्पद आहे. मी हप्ते मागत असेल, तर त्यांनी पुरावा द्यावा. मी तसे काहीही मागितलेले नाही येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुका लक्षात घेऊन विरोधकांनी रचलेला हा डाव असून, व्यावसायिकाला हाताशी धरून चुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा प्रति-आरोप वैभव पाटील यांनी केला आहे.

# शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांची निवडणूक आरक्षण सोडतीवर हरकत


## अन्याय दूर न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने काही दिवसांपूर्वी सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर केली. मात्र या आरक्षण प्रक्रियेवर आता शिवसेनेने (शिंदे गट) हरकत घेतली आहे. कल्याण पश्चिम शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे.

शिवसेना कल्याण पश्चिम शहरप्रमुख रवी पाटील यांनी महापालिका निवडणूक आरक्षण सोडतीमध्ये प्रभाग क्रमांक 3, 5 आणि प्रभाग क्रमांक 15 वर अन्याय झाल्याचे म्हटले आहे. प्रभाग क्रमांक ३, ५ आणि १५ मधील आरक्षण सोडतीवर आक्षेप घेत या तिन्ही प्रभागांमध्ये आरक्षणाची रचना समाजातील सर्व घटकांना न्याय देणारी नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

प्रभाग क्र. ३, ५ आणि १५ मध्ये आरक्षणाचे वितरण SC, ST, OBC आणि सर्वसाधारण घटकांमध्ये पुरेशा प्रमाणात न्याय देणारे नसून त्यात अनुचित असमानता आढळत



असल्याचा पाटील यांचा आरोप आहे. सर्व प्रभागांमध्ये आरक्षणाचे योग्य संतुलन न राखल्याने काही घटकांना प्रतिनिधित्व मिळणार नाही असेही त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. या संदर्भात पाटील यांनी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल आणि राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे आरक्षणातील त्रुटी दूर करून सर्व समाजघटकांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

प्रभाग क्रमांक 3 मध्ये अ- अनु. जाती ब- अनु . जमाती महिलांसाठी क- नागरिकांचा मागास प्रवर्ग ड – सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 5 मध्ये अ- अनु .जाती ब- अनु. जमाती क- नागरिकांचा मागास प्रवर्ग ड - सर्वसाधारण महिला आणि प्रभाग क्रमांक 15 मध्ये अ- अनु . जाती महिला ब-अनु . जमाती महिला क- नागरिकांचा मागास प्रवर्ग ड – सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे. यासंदर्भात आरक्षणातील पुनर्विलोकन करून असमानता तातडीने दूर करण्याची मागणी करत तसे न झाल्यास याप्रकरणी कायदेशीर मार्ग अवलंबण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# प्रेमाच्या जाळ्यात अडकवून फसवणूक केल्याप्रकरणी प्रसिद्ध रील स्टारला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ठाण्यात राहणारा रिल स्टार शैलेश रामूगडे याला डोंबिवलीच्या विष्णू नगर पोलिसांनी अटक केली आहे. शैलेश आगोदर मैत्री करताचा नंतर विश्वास संपादन करून प्रेमाच्या जाळयात अडकून त्याच्या कडून सोन्याचे दागिने आणि रोख पैसे काढायचा. गेल्या वर्षी ठाण्याच्या कापुरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याचं बरोबर विष्णूनगर पोलिस ठाण्यात देखील एका तरुणीची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. तिच्या तक्रारीवरून विष्णूनगर पोलिसांनी शैलेश रामुगडे अटक केली असून याच्याकडून ३७ लाखांचे दागिने, एक बीएमडब्लू कार, चार महागडे आयफोन हस्तगत केले आहेत. शैलेश रामुगडेचे इन्स्टाग्रामवर ९ लाख फॉलोवर्स असून त्याच्याविरोधात आणखी तक्रारी येण्याची शक्यता आहे. याबत पुढील तपास विष्णू नगर पोलीस करत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिली.

# रोह्याचा शुभम दिवेकर मिस्टर रायगडचा अंतिम विजेता तर संजोग पाटील उपविजेता

## महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील 19 स्पर्धकांनी घेतला सहभाग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण नगरपरिषदेच्या मैदानावर स्वररंग पेण तर्फे भरविण्यात आलेल्या पेण फेस्टिवल मध्ये मिस्टर रायगड 2025 ही स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत रोह्याचा शुभम सतीश दिवेकर हा मिस्टर रायगडचा अंतिम विजेता ठरला. तर अलिबागचा संजोग पाटील याने स्पर्धेत द्वितिय व पेणचा तन्मय गावंड याने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील 19 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेतील बेस्ट कॉस्च्युम आशुतोष मनोहर कांबळे (बदलापूर), बेस्ट हेअर साहिल निलेश तलाठी (महाड), बेस्ट स्माईल भावेश चिले (खोपोली), बेस्ट पर्सनॅलिटी चंद्रमा रामचंद्र (दिघा), बेस्ट फोटोजनिक अथर्व



विजय सरके (अलिबाग) या स्पर्धकांना अवॉर्ड देऊन सन्मानीत करण्यात आले. सदर स्पर्धेचे परिक्षण पत्रकार कमलेश ठाकूर, विजय मोकल, यशश्री सुरावकर, करिष्मा मोकल यांनी केले तर कोरियोग्राफी जयेश पाटील (अलिबाग) यांनी केले.

मिस्टर रायगडच्या सर्व विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी केले.

रायगड जिल्ह्यासह मुंबई, पेण, नवी मुंबई, लोणावळा, अलिबाग, खोपोली, माणगाव, महाड, ठाणे, उरण अश्या विविध भागांतील एकूण 19 स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. ट्रेडिशन ,इन्ट्रोड्यूस राउंड, वेस्टन राउंड व प्रश्नोत्तर राउंड अशा 2 राउंड मध्ये स्पर्धा सादर करण्यात आली. या स्पर्धेला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

# भावालाच घातला 19 कोटींचा गंडा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** पिंक ट्रेडर्स फर्मचे नावे असलेल्या बँक खात्याच्या सहीचा गैरवापर करून फर्ममधून १९ कोटी ४६ लाख २१ हजार ९९३ रुपये २०१४ ते आजपर्यंत काढून भावानेच भावाची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

याप्रकरणी मध्यवर्ती पोलिस ठाण्यात प्रदीप वाशुमल किशनानी व नेहा प्रदीप किशनानी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्हासनगर कॅम्प नं. ३ परिसरात रमेश किशनानी हे कुटुंबासह राहतात.रक्कम काढून भावाची फसवणूक केली.फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाल्यावर रमेश यांनी मध्यवर्ती पोलिस ठाणे गाठून झालेला प्रकार कथन केला. अखेर मध्यवर्ती पोलिसांनी प्रदीप व नेहा यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. कुटुंबामध्ये काही आधीपासून वाद होते का या अंगानेही तपास केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. आणखी या दोघांनी कुणाला गंडा घातला का हेही पाहिले जाणार आहे.




ठाणे ■ रविवार
१६ नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
पान ४

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये बिरसा मुंडा जयंती साजरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे दि. १८.०२.२०२५ च्या परिपत्रकान्वये आणि भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांचे निर्देशानुसार आज दिनांक १५.११.२०२५ रोजी बिरसा मुंडा जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर प्रभाग समिती क्र.३ प्रभाग अधिकारी श्री. सुरेंद्र भोईर यांच्या शुभहस्ते बिरसा मुंडा यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्रभाग समिती क्र. १ प्रभाग अधिकारी श्री. मकसुम शेख, समाज कल्याण विभाग प्रमुख श्री. मिलींद पळसूले, शहर विकास प्रमुख श्री. समीर जवरे, श्री. संजय भोईर (पत्रकार) व महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.



## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका



एकदा वापरून फेकून देण्याजोग्या ( सिंगल युज ) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत.

निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

### वारकरी महाअधिवेशनात निर्धार

# तीर्थक्षेत्रे मद्य-मांसमुक्त व्हावीत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रे मद्य आणि मांसमुक्त करावीत, तसेच मंदिर परिसरात अन्य धर्मियांच्या प्रचारावर बंदी घालण्यासाठी कठोर कायदा करावा, यांसारख्या प्रमुख मागण्यांसह १९ व्या भव्य वारकरी महाअधिवेशनात महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आले. 'वारी आळंदीची, राष्ट्र आणि धर्मरक्षणाची' हे ब्रीदवाक्य घेऊन पार पडलेल्या या अधिवेशनात राज्यभरातील एक हजाराहून अधिक वारकरी आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते सहभागी झाले होते.

हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रीय वारकरी परिषद आणि अन्य संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येथील सद्गुरू श्री गंगागिरी महाराज मठात कार्तिक वद्य एकादशीच्या निमित्ताने हे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. 'वारकऱ्यांची श्रद्धास्थाने, देवता आणि संत यांच्यावर होणारे आघात' या गंभीर विषयावर मंथन करण्यासाठी राज्यभरातील संत आणि वारकरी एकत्र आले होते.

या वेळी बोलताना प.पू. रामगिरी महाराज म्हणाले की , रामायणातील उदाहरणे विकृत पद्धतीने मांडून आदिवासींचे धर्मांतरण करण्याचे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे षड्यंत्र हाणून पाडले पाहिजे. सद्गुरू गंगागिरी महाराजांनी २०० वर्षांपूर्वी चारी वर्णांच्या हिंदूंना एकत्र करण्याचे महान कार्य केले. आपणही




आपापल्या प्रभावक्षेत्रात हे कार्य केले, तर धर्मांतरण रोखणे शक्य होईल.

ह.भ.प. जनार्दन महाराज मेटे म्हणाले की , संत-महंतांनी संघटित होऊन संदेश देण्याची परंपरा ज्ञानेश्वर माऊलींच्या काळापासून चालत आली आहे; पण आज आळंदीत आरोग्य आणि शिक्षण याचे महत्त्व सांगत ख्रिश्चन मिशनरी आळंदीतील हिंदूंचे धर्मांतरण करत आहेत. याला आपण आळा घातला पाहिजे.

या वेळी हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की , जादूटोणा कायद्याच्या प्रचारासाठी नेमलेली; परंतु देव-धर्माची टीका करणारी महाराष्ट्र शासनाची 'जादूटोणा विरोधी कायद्याची जनजागृती, प्रचार व प्रसार समिती' (PIMC) तात्काळ बरखास्त करण्यात यावी. तसेच नास्तिक आणि अर्बन नक्षलवादी विचारसरणीचे काही लोक पंढरीच्या वारीमध्ये वारकऱ्यांचा बुद्धीभेद घडवून आणत आहेत; हे त्वरित थांबवले पाहिजे. राज्यातील हिंदुत्ववादी सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व संत-महंतांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या वेळी सरकारशी चर्चेसाठी एकत्र येण्याचे आवाहन श्री. घनवट यांनी केले.

रणरागिणी समितीच्या कु. क्रांती पेटकर



**श्री. सुनील घनवट,**
**राज्य संघटक, महाराष्ट्र व छत्तीसगड,**
**हिंदु जनजागृती समिती,**
**(संपर्क क्र. : ७०२०३८३२६४)**

यांनी लव्ह जिहादचे भयावह वास्तव मांडून कायदा करण्याची मागणी केली. ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांनी तीर्थक्षेत्रे मद्य-मांस मुक्त करणे, इंद्रायणी नदीचे जलशुद्धीकरण करणे यासारख्या मागण्या शासनाकडे लावून धरण्याचे आश्वासन दिले.

अधिवेशनात संमत झालेले प्रमुख ठराव: महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रे मद्य-मांसमुक्त करून त्यांच्या पावित्र्याचे रक्षण करावे

### धर्मांतर थांबवण्यासाठी कठोर कायद्याची मागणी!

आणि मंदिर परिसरात अन्य धर्मियांच्या प्रसारावर बंदी घालावी. हिंदू युवतींच्या संरक्षणासाठी राज्यात 'लव्ह जिहाद विरोधी कायदा' तातडीने संमत करावा. हिंदूंची मंदिरे आणि भूमी बळकावणारा 'वक्फ कायदा' त्वरित रद्द करावा. इंद्रायणी आणि चंद्रभागा नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी. राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्याची अत्यंत कठोर अंमलबजावणी करावी. पंढरीच्या वारीमध्ये नास्तिकतावादी व अर्बन नक्षलवाद्यांकडून होणारा बुद्धीभेद थांबवावा.

या अधिवेशनाला दंडी स्वामी अमृताश्रमानंद महाराज, ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, ह.भ.प. दत्तात्रय चोरघे महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, ह.भ.प. निरंजन शास्त्री कोठेकर महाराज, कै. मामासाहेब दांडेकर स्मृती प्रतिष्ठान, ह.भ.प. बापू महाराज रावकार, ह.भ.प. संग्राम बापू भंडारे हे उपस्थित होते.

# सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात बालदिन उत्साहात साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**म्हसा** : मुलांचे हक्क, शिक्षण आणि कल्याण याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी भारतात बालदिन साजरा केला जातो. दरवर्षी 14 नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो, या दिवशी संपूर्ण भारतभर मुलांसाठी अनेक शैक्षणिक आणि प्रेरक कार्यक्रम आयोजित केले जातात. याच अनुषंगाने सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहात साजरी केली गेली. या प्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच प्रा. कन्या हरड मॅडम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. मयुरी घागस यांनी केलं.



# बालकलाकारांनी सादर केला लोककलेचा महाजल्लोष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून "जल्लोष लोककलेचा" हा लोककला महोत्सव १४ नोव्हेंबर रोजी मराठा मंदिर हॉल कल्याण पश्चिम येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती आयोजित, बालरंगभूमी परिषद कल्याण कल्याण शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कल्याण शाखा अध्यक्ष रविंद्र सावंत, सांस्कृतिक सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अध्यक्ष हेमंत यादगिरे, परिक्षक प्राध्यापक विकास कोकाटे, लोककला अभ्यासक प्राध्यापक महेश थोरात, कथ्थक गुरु




स्मिता मोरे, बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या अध्यक्षा सुजाता डांगे, प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे, उपाध्यक्ष संजय गावडे या मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करून "जल्लोष लोककलेचा" या भव्यदिव्य स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे यांनी प्रस्ताविक करताना स्पर्धेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेतलेल्या स्पर्धकांचे भरभरून कौतुक केले. लोककलेचे महत्त्व पटवून देत स्पर्धेसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन करत स्पर्धेतील सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या.

एकल गायन या गटाने महोत्सवाची दणदणीत सुरुवात झाली. गोंधळ,जोगवा, शेतकरी गीत, कोळी नृत्य बघून पाहुणे प्रेक्षक भारावून गेले. सांघिक गायन, सांघिक नृत्य,एकल वादन, एकल गायन, एकल नृत्य अशा एकापेक्षा एक लोककलांचे स्पर्धकांनी सादरीकरण केले. रसिक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्तम प्रतिसाद देत कल्याण शाखेला उत्तम नियोजन करून बालकलावंतांना रंगमंच उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

एकल गायन, एकल वादन, एकल नृत्य सादरीकरण झाल्यानंतर बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती अध्यक्षा ॲड.निलम शिर्के-सामंत यांनी बालकलावंतांशी संवाद साधत लोककलेचा वारसा आपल्या खांद्यावर घेऊन जोपासणाऱ्या लोककलावंतांचे महत्त्व आणि सादरीकरण करण्यासाठी लागणाऱ्या सर्व महत्त्वाच्या गोष्टींची माहिती दिली. तसेच बालरंभूमी परिषद बालकलावंतासाठी अनेक उपक्रम कश्याप्रकारे राबवत आहेत हे सांगत पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी बालकलावंतांनी मोठ्या प्रमाणात बालरंगभूमी परिषदेचे सभासदत्व घेऊन बालरंगभूमी परिषद नावाचे वटवृक्ष डेरेदार व भव्य करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. ॲड निलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते एकल गायन,एकल वादन,एकल नृत्य या तिन्ही गटातील स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

# भिवंडीत डंपरची वाहनांना धडक सहा वाहनांचे नुकसान



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील न्यू आझाद नगर रहिमतपुरा रस्त्यावर एका आयवा डंपरचा ब्रेकफेल झाल्याने नियंत्रण सुटलेल्या डंपरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकी ,दोन रिक्षा,इको गाडी यांना ठोकर देत रस्त्यालगत सुरू असलेल्या बांधकामाला ठोकर मारत टेम्पोला धडक दिली.शेवटी हा डंपर वीज पुरवठा करणाऱ्या खांबाला धडक देत थांबला.अचानक झालेल्या या प्रकारामुळे रस्त्यावरील पादचारी नागरिकांची जीव वाचवण्यासाठी धावपळ उडाली होती.झालेल्या प्रकाराची माहिती पोलिसांना कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन डंपर चालकास ताब्यात घेतले. शनिवार दुपारची वेळ असल्याने सुदैवाने या धडकेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी सहा वाहनांचे नुकसान झाले आहे.या घटनेनंतर शांतीनगर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत त्यांनी चालकास ताब्यात घेतले आहे.या अपघाताची नोंद पोलिसांनी घेतली आहे.

**सुदैवाने जीवितहानी टळली**

# बालदिनानिमित्त १५० शाळांना प्रथमोपचार पेटी वाटप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शुक्रवारी शालोपयोगी प्रथोमचार पेटी वाटप व बालदिन सोहळा जुनी कॅनरा बँक सभागृह, कल्याण पूर्व येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कल्याण व डोंबिवली मधील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या १५० शाळांच्या माध्यमातून ३५० क्रीडा शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विक्रांत शिंदे, उपाध्यक्ष तथा अमेय हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. कुलदीपक शिंदे, कार्याध्यक्षा राजेश्वरी शिंदे, सहखजिनदार तथा अमेय हॉस्पिटलचे सी.इ. ओ. कमलेश ठाकरे, उद्योजक संतोष सावंत, सचिव अविनाश नलावडे व पदाधिकारी, देवबा सूर्यवंशी, राजेंद्र लिंगायत, सम्राट अशोक विद्यालय प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता नलावडे, तिसाई विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वाघ यांच्याहस्ते



द्वीपप्रज्वलन व भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठानचे सचिव अविनाश नलावडे यांनी केले. अध्यक्ष विक्रांत शिंदे यांनी आपल्या मनोगतात, आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठानचे ध्येय व उद्दिष्ट सांगितले. जगन्नाथ शिंदे यांचे ठाणे जिल्हा क्रीडा क्षेत्र विकास करण्याचा आहे. यासाठी अनेक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याचा आमचा मानस असल्याचे सांगितले. कार्याध्यक्षा राजेश्वरी शिंदेंनी मनोगतात, भविष्यात प्रतिष्ठानद्वारे आयोजित स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त शाळांनी भाग घ्या. तुम्हाला भेडसावणाऱ्या समस्याचे आम्ही निराकरण करू. कल्याण डोंबिवली मधून चांगले खेळाडू घडले पाहिजे असे सांगितले.

प्रतिष्ठान द्वारे १५० शाळेतील क्रीडा शिक्षकांना शालोपयोगी प्रथमोपचार पेटी तसेच उपस्थित शाळेतील गुणवंत विद्यार्थांना गौरवपत्र व बालदिनानिमित्त अल्पोपहार वाटप करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्वच सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रवीण खाडे, प्रताप पगार, संजय काळे, सुभाष गायकवाड, लक्ष्मण इंगळे, सुप्रिया नाइकर, सुभाष मते, मुकुंद गायधनी, नंदलाल पवार, अंकुर आहेर आणि मॉडेल कॉलेज कल्याणचे स्काऊट गाईडचे विद्यार्थी यांचा मोलाचे सहकार्य मिळाले. कार्यक्रमाच सूत्रसंचालन प्रवीण खाडे यांनी केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024